# आम्ही काय केलं.



निशाणी - रेल्वे इंजिन

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना

# अर्पण पत्रिका

'जगाला हेवा वाटेल असा महाराष्ट्र' घडवण्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं स्वप्न आहे आणि त्यासाठी संघर्ष देखील सुरू आहे. असंच स्वप्न बघणाऱ्या आणि त्यासाठी संघर्ष केलेल्या प्रत्येकाला तसंच महाराष्ट्राचं प्रबोधन करणाऱ्या संत परंपरेला, ज्यांनी आपल्याला ओळख दिली त्या छत्रपती शिवाजी महाराजांना, नवा विचार करणाऱ्या आणि रुजवणाऱ्या प्रवाही सुधारकांना, लाखाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांना, कष्टाच्या घामाने ही भूमी सुपीक ठेवणाऱ्या कष्टकऱ्यांना, अलौकिक लेखणीतून मराठी माणसाची मनं विचारी ठेवणाऱ्या सरस्वती पुत्रांना आणि संघर्षात महाराष्ट्राला नैराश्यात जाऊ न देणाऱ्या साहित्यिक, कलावंतांना ही पुस्तिका मी अर्पण करत आहे.

निशाणी - रेल्वे इंजिन

सस्नेह जय महाराष्ट्र

आज ९ मार्च २०२३ ला ही पुस्तिका महाराष्ट्राला सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेला १७ वर्ष पूर्ण झाली; या काळात निवडणुकीच्या राजकारणात पक्षाने अनेक चढउतार पाहिले, पण तरीही माझा महाराष्ट्र सैनिक खचला नाही. मराठी माणूस, मराठी भाषा, आणि महाराष्ट्र हा आमचा श्वास आहे तर हिंदुत्व हा आमच्या कडव्या अभिमानाचा विषय आहे. या दोन्हीवर जेव्हा जेव्हा संकट आलं तेव्हा तेव्हा आम्ही संघर्ष केला, तुरुंगवास सोसला. इतकं सगळं होऊनदेखील जेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने काय केलं? तुम्ही आंदोलनं अर्धवट सोडली असं काही मूठभर म्हणतात, तेव्हा निश्चित त्रास होतो.

या असल्या चर्चांनी मी यत्किंचितही हलत नाही, पण वाईट वाटतं ते माझ्या महाराष्ट्र सैनिकांसाठी. त्यांनी स्वतःच आयुष्य या आंदोलनांसाठी पणाला लावलं, या काळात त्यांच्या घरच्यांच्या जीवाला किती घोर लागला असेल याची मला कल्पना आहे.

या सगळ्यांचा विचार करून ठरवलं की माझ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने गेल्या १७ वर्षांत काय केलं हे मांडलं पाहिजे. हे फक्त काही टीका करणाऱ्या त्या चार तोंडांसाठी नाहीये तर महाराष्ट्रातील जनतेला पण सादर केलेला अहवाल आहे.

हा अहवाल फक्त राज्यव्यापी पातळीवर हाती घेतलेल्या आंदोलनांचा आणि उपक्रमांचा एक आढावा आहे. जिल्ह्या-जिल्ह्यात, विविध शहरांमध्ये जी आंदोलनं हाती घेतली गेली किंवा जे उपक्रम राबवले गेले, त्या सगळ्याचा समावेश जर या पुस्तिकेत करायचा ठरला असता तर, ही पुस्तिका न राहता तो एक ग्रंथ झाला असता, इतकं काम माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी केलं आहे.

गेल्या १७ वर्षांत इतकं काम करून जेंव्हा निव्वळ सवंग राजकारण करणारे पक्ष सत्तेत येतात, आणि आमच्या पक्षाला संधी मिळत नाही तेंव्हा वाईट वाटतं. पण महाराष्ट्रातील जनता सुज्ञ आहे, ती आमच्या कामाकडे नक्कीच सकारात्मक नजरेने बघेल ह्याची खात्री आहे.

सत्ता नसताना जर माझा पक्ष इतकं काम करू शकतो, तर सत्ता आल्यावर काय करू शकेल याचा अंदाज तुम्हाला यावा म्हणून हा प्रयत्न.

मी नेहमी म्हणतो आमची सत्ता रस्त्यावर, जी आम्ही संघर्षातून मिळवलीच. पण आता सत्ता संसदीय सभागृहांमध्येदेखील मिळवायची आहे, कारण त्या जोरावर आम्ही अधिक प्रभावी काम करून दाखवू शकू. आणि ती सत्ता महाराष्ट्राच्या जनतेकडे मागताना आम्ही इतरांपेक्षा जास्त लायक आणि प्रामाणिक आहोत हे तुम्हाला कळावं यासाठीच हा प्रयत्न.

'आम्ही काय केलं.' याचा हा अहवाल जरूर वाचा.

आपला नम्र



राज ठाकरे

सत्ता हे साध्य नाही तर ते एक लोकविकासाचं साधन आहे , हे आम्ही नाशिकमध्ये सत्तेच्या काळात सिद्ध केलं !

महाराष्ट्रात मराठी भाषा शिकणं, बोलणं हे अनिवार्यच असायला हवं, पण त्याचा विसर पडायला लागला होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळेच सर्व अभ्यासक्रमांच्या शाळांत मराठी शिकवणं अनिवार्य झालं !

व्यवहारात मराठीचा विसर शासनालाच व्हायला लागला, तेव्हा आम्ही शासनात आणि प्रशासनात मराठी भाषा सक्तीची करून घेतली !

मोबाईलवर मराठी ऐकू यायचं नाही, ते ऐकू येऊ लागलं !

चित्रपटगृहांमध्ये मराठी सिनेमांसाठी राखीव खेळ असायला हवेत असा कायदा होता, पण हे घडलं ते आमच्या संघर्षामुळे !

अनेक दुकानांच्या नावाच्या पाट्या मराठीत नसायच्या , त्या पाट्यांवर मराठी अक्षरं आमच्यामुळे उमटली !

शासकीय अर्थात निरस पद्धतीने साजरा होणारा २७ फेब्रुवारीचा 'मराठी भाषा गौरव दिन' आमच्यामुळे उत्साहाने सणासारखा साजरा होऊ लागला !

वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, यासाठी राज्यभर शेकड्याने पुस्तक प्रदर्शनं भरवणारा एकमेव राजकीय पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दीर्घ संघर्षामुळे रेल्वे भरतीबद्दलची माहिती मराठी मुलांना कळू लागली, रेल्वे भरतीत मराठी मुलांचा टक्का वाढला !

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने राज्यभर ५०० हून अधिक रोजगार मार्गदर्शन मेळावे भरवले !

महाराष्ट्रातील शहरांना अनधिकृत रिक्षा आणि टॅक्सींनी वेढून टाकलं होतं, त्यावर पहिली कारवाई झाली ती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळे !

मायक्रोफायनान्स कंपन्या आणि पीक विमा कंपन्यांच्या मुजोरीवर चाप बसला, तो महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळेच !

ज्या नाशिकमध्ये सत्ता मिळाली, तिथे केलेल्या कामाचं सादरीकरण करून मतं मागणारा एकमेव पक्ष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

राज्याच्या विकासाची 'ब्ल्यू-प्रिंट' मांडणारा देशातला पहिला राजकीय पक्ष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

रितसर अभ्यासक्रम देऊन, परीक्षा घेऊन, उमेदवार संसदीय राजकारणासाठी योग्य आहे का नाही हे बघणारा एकमेव पक्ष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

मुंबईच्या २० वर्षांच्या आराखड्यावर चर्चा आणि जनमत घडवून आणणारा महाराष्ट्रातील पहिला आणि एकमेव पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

‘टोल’धाडीविरुद्ध आंदोलन करून ६५ टोलनाके बंद करायला लावणारा पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

नागरिकत्व सुधारणा कायद्याला पाठिंबा देणारा इशारा मोर्चा, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

रेल्वे स्थानक परिसर फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुक्त व्हावा म्हणून मोर्चा आणि संघर्ष करणारा पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

महाराष्ट्रातील माध्यमकर्मींवर आणि महिला पोलिसांवर हात उगारत, धुडगूस घालणाऱ्या रझा अकादमीच्या विरोधात, मोर्चा काढून निषेध नोंदवणारा एकमेव राजकीय पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

परिवहन (एसटी) कामगारांच्या हक्कासाठी लढणारा आणि त्यासाठी मोर्चा काढणारा पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी मोर्चे काढणारा पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

मशिदींवरच्या भोंग्याविरुद्ध आवाज उठवून, आंदोलन उभा करणारा पक्ष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

भारतीय भूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ले होणार आणि त्याच पाकिस्तानमधील कलाकारांना इथे काम दिलं जाणार, हे कोणत्याही राष्ट्रप्रेमी व्यक्तीला मान्यच होणार नाही. या पाकिस्तानी कलावंतांना भारताचे दरवाजे बंद झाले, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळे !

दहीहंडी, गणेशोत्सव यासारख्या पारंपरिक हिंदू सणांवरच निर्बंध का ?
हिंदू सणांसाठी, मराठी मनांसाठी उभी राहिली महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

महाराष्ट्रावर कोणतीही आपत्ती आली, तर सर्वतोपरी मदत घेऊन उभी राहते महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

# आणि सगळ्यात शेवटचं पण तितकंच महत्त्वाचं, जिथे जिथे अन्याय दिसला तिथे तिथे बिनदिक्कतपणे लाथ हाणते, महाराष्ट्र नवनिर्माण सेनाच !

निशाणी - रेल्वे इंजिन

सत्ता हे साध्य नाही
तर ते एक
लोकविकासाचं
साधन आहे,
हे आम्ही
नाशिकमध्ये सत्तेच्या
काळात सिद्ध केलं !

## विकासाचं ‘नाशिक मॉडेल’

राजकीय पक्षांनी सत्तेकडे ‘साध्य’ म्हणून न बघता त्याच्याकडे ‘साधन’ म्हणून बघावं या विचारांचा आमचा पक्ष आहे. गेल्या १७ वर्षांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला फक्त एकदाच सत्तेची संधी मिळाली, नाशिक महानगरपालिकेची. नाशिककरांनी ही संधी आम्हाला दिली, आम्ही या संधीचं सोनं करून दाखवलं !

या ५ वर्षांच्या सत्ताकाळात आम्ही नाशिकमध्ये ५१० किलोमीटरचे रस्ते बांधले. अगदी शहरातील गल्ल्यांमधले रस्तेसुद्धा सिमेंट कॉंक्रीटचे दणकट रस्ते बनवले. जिथे महाराष्ट्रातील अनेक शहरांत एका पावसात रस्ते वाहून जातात, तिकडे आमच्या काळात आम्ही बांधलेले रस्ते पुढे झालेल्या अतिवृष्टीच्या काळात पण तितकेच दणकट राहिले.

नाशिकच्या पुढच्या ५० वर्षांच्या पाण्याच्या गरजांचा विचार करून मुकणे धरणातून पाणीपुरवठा योजना सुरू केली. नाशिक शहर कितीही विस्तारलं तरी शहराला मुबलक पाणीपुरवठा राहील.

सांडपाणी मलजल शुद्धीकरण (STP) प्रकल्प उभारला, इतका सुसज्ज एसटीपी प्रकल्प महाराष्ट्रात पहिल्यांदाच उभारला गेला !

घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प उभारला आणि या कचऱ्यातून खत निर्माण करणारा प्रकल्प सुरू केला. हे खत आसपासचे शेतकरी विकत घेऊन जातात. यातून महापालिकेला अर्थार्जनाचा एक पर्याय उपलब्ध करून दिला.

नाशिक महापालिकेचा कारभार तंत्रस्नेही व्हावा, यासाठी ‘स्मार्ट नाशिक’ ॲप सुरू केलं. एका क्लिकवर नागरिकांच्या सगळ्या गरजा भागवल्या गेल्या पाहिजेत आणि त्यांचे प्रश्न सोडवले गेले पाहिजेत ही आमची धारणा होती, जी आम्ही ‘स्मार्ट नाशिक’ ॲपमधून कृतीत आणून दाखवली.







महापालिकेचं काम फक्त रस्ते बांधणं, गटारं बांधणं आणि कचऱ्याची विल्हेवाट लावणं इतकंच नसावं असं आमचं मत. आणि जगभरातही तिथल्या स्थानिक स्वराज्य संस्था त्या त्या शहराला आकार देतात, ती शहरं घडवतात. जगभरात अशा अनेक शहरांचा अभ्यास करून आम्ही नाशिकला एक आकार देण्याचा निर्णय घेतला.

• आपण सगळे तक्रार करतो की, हल्ली शहरात ट्रॅफिक सेन्सच राहिला नाहीये, पण मुळात ट्रॅफिक सेन्स म्हणजे काय, ट्रॅफिकचे नियम काय असतात हे कुठे शिकवलं जातं? जर हे सगळं मुलं-मुली लहान असतानाच शिकवलं तर ते पुढे नियम मोडणारच नाहीत. हाच विचार करून आम्ही महिंद्रा उद्योगसमूहाच्या सीएसआर निधीतून 'चिल्ड्रेन ट्रॅफिक पार्क' उभारलं. देशातील इतक्या मोठ्या आकाराचं हे पहिलं ट्रॅफिक पार्क असेल. या ट्रॅफिक पार्कला अनेक तज्ज्ञांनी भेट देऊन त्याचं मनापासून कौतुक केलं.

• मानवी संस्कृती ही नदीकाठावरच विकसित झाली. त्यामुळे नदीचं आणि तिथल्या नागरिकांचं एक वेगळं नातं असतं. जगात अनेक महत्त्वाची शहरं ही नदीकाठी वसली आहेत आणि तिथले नदीकाठ सुंदर विकसित केले जातात, जिथे लोकं येऊन बसतात, ती पर्यटनस्थळं म्हणून विकसित होतात. गोदावरी ही नाशिकची जीवनवाहिनी आणि नाशिककरांच्या जिव्हाळ्याचा विषय. मग गोदावरीचा नदीकाठ पण सुंदर असायला हवा, नाशिककरांना तसेच पर्यटकांना येऊन छान बसायला जागा हवी म्हणून आम्ही रिलायन्स उद्योगसमूहाच्या सीएसआर निधीतून 'गोदापार्क' उभारलं. नदीपात्रात सुंदर कारंजी उभारली.

• जगभरात प्रत्येक शहरात एकतरी देखणं असं वस्तुसंग्रहालय असतं. तसं एखादं नाशिकमध्ये पण असावं अशी आमची इच्छा होती. हे संग्रहालय स्व. बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ असावं असा आमचा मानस होता. जीव्हीके उद्योगसमूहाच्या सीएसआर निधीतून आम्ही शिवकालीन शस्त्रसंग्रहालय उभारलं.

• सगळ्यात मोठा प्रकल्प म्हणजे टाटा समूहाच्या सीएसआर निधीतून उभारलेलं 'वनस्पती उद्यान'. आज महाराष्ट्रात कुठल्याही शहरात जा, तुम्हाला शहरातील मोकळ्या जागा आक्रसत चाललेल्या दिसतील. लहान मुलांना सुट्टीच्या दिवशी कुठे फिरायला न्यायचं हा प्रश्न पालकांना पडतो. लहान मुलं तर झालीच, वयाने मोठे असलेल्या नागरिकांना पण निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन बसायचं म्हटलं तर शहरांमध्ये कुठे जागा शिल्लक आहेत? हाच विचार करून नाशिकमध्ये आम्ही अतिशय देखणं वनस्पती उद्यान उभं केलं.

आणि हे सगळे प्रकल्प उभे केले ते उद्योगसमूहांच्या सीएसआर निधींमधून. बरं, देशातील सगळ्या अग्रणी उद्योगसमूहांनी आम्हाला आमच्या कल्पनांसाठी निधी उपलब्ध करून दिला. उद्योगसमूह जेव्हा निधी देतात तेव्हा त्याचा विनियोग नीट होईल याची खात्री असल्याशिवाय देत नाहीत, पण आमच्या हेतूंबद्दल पूर्ण विश्वास असल्यामुळे हे सगळे उद्योगसमूह आमच्या पाठीशी उभे राहिले.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं विकासाचं मॉडेल:

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने 'विकासाचं नाशिक मॉडेल' जन्माला घातलं, ते वास्तवात आणून दाखवलं. आम्ही नाशिकमध्ये २०१२ ते २०१७ या काळात सत्तेत होतो. या काळात आमच्यावर एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही आणि यापुढे जेव्हा आणि जिथे सत्ता मिळेल तिथे आमच्याकडून एकही चुकीचे काम होणार नाही याची खात्री बाळगा.

'जी संधी मिळेल, त्या संधीचं सोनं करायचं, कोणतंही काम घेतलं तर ते किमान २० ते ५० वर्षांचा विचार करून करायचं आणि हे करताना एका पैश्याचाही भ्रष्टाचार होऊ द्यायचा नाही, हेच आमचं विकासाचं मॉडेल'.



‘मराठी’ हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा आत्मा आहे, ओळख आहे. त्यामुळे पक्षस्थापनेपासून मराठी भाषेचा मान राखला गेलाच पाहिजे यासाठी आम्ही संघर्ष केला.

# महाराष्ट्रात मराठी भाषा शिकणं, बोलणं हे अनिवार्यच असायला हवं, पण त्याचा विसर पडायला लागला होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळेच सर्व अभ्यासक्रमांच्या शाळांत मराठी शिकवणं अनिवार्य झालं !

आज राज्यात महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाच्या शाळा आहेत, तशाच सीबीएसई, आयसीएसई, आयजी असे अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शाळादेखील आहेत. शाळेने स्वीकारलेला अभ्यासक्रम कोणताही असो, ती शाळा ज्या राज्यात आहे, त्या राज्याची राज्यभाषा ही शाळेत शिकवली गेलीच पाहिजे. बरं ही सक्ती नाही, उलट तुम्ही ज्या राज्यात शिकता त्या राज्याची भाषा तुम्हाला यायलाच हवी, हा नियम देशातील इतर राज्यात आणि जगातील सर्व देशांमध्ये आहे. जेव्हा महाराष्ट्रात काही शाळांमध्ये मराठी डावलण्याचा प्रयत्न सुरू झाला, तेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आंदोलन उभं केलं. मनसेच्या रेट्यामुळे अनेक शाळांनी माघार घेत मराठी शिकवायला सुरू केलं, पण आम्ही तेवढ्यावर न थांबता, तत्कालीन राज्य सरकारला निर्णय घ्यायला लावला. आज तुमची मुलं कुठल्याही अभ्यासक्रमाच्या शाळेत शिकू देत, ती मराठी शिकत आहेत ते फक्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळेच.

# व्यवहारात मराठीचा विसर शासनालाच व्हायला लागला, तेव्हा आम्ही शासनात आणि प्रशासनात मराठी भाषा सक्तीची करून घेतली !

## महाराष्ट्रात शासनच मराठी विसरणार असेल तर आम्ही गप्प बसू?

महाराष्ट्रात शासनाचा सर्व कारभार हा मराठीतूनच झाला पाहिजे. कारण महाराष्ट्राची भाषा मराठी आहे. सरकारी पत्रव्यवहार, शहरांचे विकास आराखडे, शासकीय योजनांची माहिती, अगदी शासकीय नामफलकही आम्ही झगडून मराठीमध्ये आणले. हे सांगायला वाईट वाटतं, पण तत्कालीन महाराष्ट्र सरकारचं मराठी भाषेबद्दलच प्रेमही बेगडी होते. असो, पण आम्ही रस्त्यावर, न्यायालयात, अगदी विधानमंडळातदेखील हा विषय उचलला. आज परिस्थिती बदलली आहे, आता शासनव्यवहार आपल्या मायमराठीत होतो. अजून न्यायालयातली भाषाही पूर्णपणे मराठी झालेली नाही. ती व्हावी म्हणून आमचे प्रयत्न सुरू आहेत.

# मोबाईलवर मराठी ऐकू यायचं नाही, ते ऐकू येऊ लागलं !

महाराष्ट्रात मोबाईलवर मराठी सोडून दुसरी भाषा ऐकू येणं म्हणजे मराठीचा अपमानच. लोकांच्या मनातून हळूहळू मराठी पुसण्याचं हे षडयंत्र आपण मोडून काढलं. तमिळनाडूमध्ये मोबाईलवर तमिळ किंवा गुजरातमध्ये गुजरातीत सूचना मिळतात, मग महाराष्ट्रात मराठी का टाळलं जातं? असा आमचा साधा सवाल होता. एका मेळाव्यात राज ठाकरेंनी ही मागणी करताच महाराष्ट्र सैनिकांनी उग्र आंदोलन उभारलं आणि काही दिवसातच मोबाईलवर मराठी भाषा ऐकू येऊ लागली.

याला एक स्वाभिमानाची बाजू होती. मराठीचा अवमान आपण सहन करणार नाही हा संदेश आपण यातून दिला, पण यामुळे दूरसंचार कंपन्यांपासून अनेक कंपन्यांनी कॉल सेंटर्सवर मराठी भाषा बोलू शकणाऱ्या मुला-मुलींची भरती केली, ज्यामुळे या मुलांना रोजगार पण मिळाला. आज मोबाईलवर तुम्हाला किंवा इतर राज्यातून महाराष्ट्रात फोन केल्यावर जर मराठी भाषा ऐकू येते ती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळेच. बरं, हे फक्त मोबाईल कंपन्यांच्या बाबतीत नाही तर इतर अनेक कंपन्या ज्या सेवा क्षेत्रांत आहेत त्यांनी आमच्या आंदोलनाचा असा काही धसका घेतला की सगळ्यांनी त्यांच्या त्यांच्या कॉल सेंटरवर मराठी बोलणारी मुलं- मुली भरती होऊ लागली.

इतकंच काय खेळाचं समालोचन मराठीत आमच्यामुळे सुरू झालं.





# मराठी चित्रपटांना चित्रपटगृहं मिळू लागली, अगदी हक्काने !

महाराष्ट्राच्या भूमीवर महाराष्ट्र शासनाने दिलेलं फायदे घेऊन चित्रपटगृह उभारणार आणि तरीही मराठी चित्रपटांना जर चित्रपटगृहांकडून डावललं जाणार असेल तर आम्ही गप्प बसणार होतो?
कुणी 'खळ्ळखट्याक' या शब्दावरून टीका केली तरी हे विसरून चालणार नाही की आमच्या 'खळ्ळखट्याक'मुळेच मराठी चित्रपटाला 'प्राईम टाईम'ला खेळ मिळू लागले. मुळात मल्टिप्लेक्सना परवानगी देताना त्यांनी त्यांचं एक सिनेमागृह हे मराठी चित्रपटांसाठी राखून ठेवायचं असा कायदाच आहे, पण त्याला सर्रास हरताळ फासला जात होता.

मोक्याच्या चित्रपटगृहात लोकांच्या सोयीच्या आणि जिथे चांगली तिकीट विक्री होते अशा वेळा आणि जागा मराठी चित्रपटांना मिळू द्यायचे नाहीत आणि मग मराठी सिनेमाचं अर्थकारण कोलमडलं की आवई उठवायची की हल्ली मराठी सिनेमा कोणी बघत नाही. या षडयंत्रामागचा हेतू होता की इतक्या मोठ्या संख्येने पसरलेल्या मराठी प्रेक्षकाने फक्त हिंदी सिनेमा बघावा. याला आम्ही चांगलाच चाप लावला. आज मराठी सिनेमासुद्धा १०० करोडचे आकडे पार करतो. तेव्हा त्यामागे महाराष्ट्र सैनिकांनी केलेला संघर्ष विसरताच येणार नाही. तसंच ज्या दादासाहेब फाळकेंनी देशातील चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली, त्या दादासाहेब  फाळकेंची तसबीर सर्व चित्रपटगृहांत असायलाच हवी हा आग्रह आम्ही आमच्या पद्धतीने लावून धरला आणि म्हणूनच हे शक्य झालं.

अनेक दुकानांच्या नावाच्या पाट्या मराठीत नसायच्या, त्या पाट्यांवर मराठी अक्षरं आमच्यामुळे उमटली !

## दुकानांच्या पाट्या बदलल्या, त्यावर मराठी आलं !

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. मग दुकानं असो की कार्यालयं, मराठी भाषेतच पाट्या असल्या पाहिजेत असा नियम अस्तित्वात असतानाही केवळ मुजोरी आणि मराठीबद्दलचा तुच्छभाव म्हणून कित्येक पाट्यांवर मराठी नव्हतं. आपल्याला या दुकानदारांना, आस्थापनांना नियम दाखवावे लागले. मुदत द्यावी लागली. संघर्ष करावा लागला. काही वेळेला मनसे पद्धतीचा दणका पण द्यावा लागला. यावरून कित्येक महाराष्ट्र सैनिकांवर खटले भरले गेले. मुळात जो नियम आहे तो जर काही मूठभर दुकानदार आणि आस्थापनं आगाऊपणाने पाळणार नसतील तर शासन कारवाई करेल तेव्हा करेल, आम्ही आमच्या पद्धतीने शासन करणार हे नक्की, जे आम्ही केलं. आमच्या आंदोलनाला विजय मिळाला. दुकानांच्या पाट्यांवर मराठी अक्षरं उमटली.







## शासकीय अर्थात निरस पद्धतीने साजरा होणारा २७ फेब्रुवारीचा 'मराठी भाषा गौरव दिन' आमच्यामुळे उत्साहाने सणासारखा साजरा होऊ लागला !

आपल्याकडे २७ फेब्रुवारी हा कवी कुसुमाग्रजांचा जन्मदिवस. तो दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जायचा, पण मुळात तो साजरा केला जायचा सरकारी पद्धतीने, अगदी उपचार म्हणून. त्याला सणाचं, उत्सवाचं स्वरूप दिलं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने. यामुळे अचानक २७ फेब्रुवारीबद्दल अमराठी लोकांमध्ये कुतूहल निर्माण झालंच, पण या निमित्ताने आम्ही राबवलेल्या, 'मी मराठी, माझी स्वाक्षरी मराठी' उपक्रमामुळे असंख्य लोकांनी मराठीतून स्वाक्षरी करायला सुरुवात केली.

## वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, यासाठी राज्यभर शेकड्याने पुस्तक प्रदर्शनं भरवणारा एकमेव राजकीय पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

मराठीसाठी आपण अक्षरशः अनेकानेक उपक्रम केले. त्यातला जास्त लोकांच्या लक्षात राहिला तो म्हणजे शिवतीर्थावर आयोजित केलेलं भव्य 'पुस्तक प्रदर्शन'.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दीर्घ संघर्षामुळे रेल्वे भरतीबद्दलची माहिती मराठी मुलांना कळू लागली, रेल्वे भरतीत मराठी मुलांचा टक्का वाढला !

महाराष्ट्रात निर्माण होणारा प्रत्येक रोजगार हा मराठी माणसासाठीच असला पाहिजे, इथे निर्माण होत असलेल्या व्यवसायाच्या संधी सर्वप्रथम मराठी माणसालाच मिळाल्या पाहिजेत हा आमचा स्थापनेपासूनचा आग्रह आहे. यासाठी आम्ही मोठा संघर्ष केला. हा संघर्ष अजिबात सोपा नव्हता, कारण या आंदोलनाच्या दरम्यान देशातील काही विशिष्ट माध्यमं आमच्यावर तुटून पडली. याची सुरुवात झाली, रेल्वे भरतीपासून.

महाराष्ट्रात होणाऱ्या रेल्वे भरतीच्या जाहिराती मराठी वर्तमानपत्रामंध्ये न देता, त्या इतर भाषिक माध्यमांमध्ये देऊन मराठी मुलांना त्या नोकरभरतीपासून दूर ठेवण्याचा डाव आमच्या लक्षात आला. या विरोधात श्री. राज ठाकरे यांनी एका भाषणात या मुद्द्याकडे लक्ष वेधून घेतलं आणि बघता बघता महाराष्ट्रभर आंदोलनं सुरू झाली. मराठी तरुण-तरुणी बेरोजगार राहणार आणि बाहेरून येणाऱ्यांना नोकऱ्या मिळणार आणि पुन्हा या लोंढ्यांचा ताण शहरावर येणार हा मुद्दा आहेच.

आमचं म्हणणं इतकंच होतं आणि आहे की ज्या राज्यात रोजगार निर्माण होतो, त्या राज्यातील तरुण-तरुणींचा त्या रोजगारावर प्रथम हक्क असायला हवा. जसं महाराष्ट्रात निर्माण होणाऱ्या रोजगारावर मराठी तरुण-तरुणींचा अधिकार असायला हवा, तसा उत्तरप्रदेश, बिहार, किंवा देशातील कोणतंही राज्य घ्या, तिथे निर्माण होणाऱ्या रोजगारावर तिथल्या तरुण तरुणींचा हक्क असायला हवा.

आम्हाला खात्री आहे की हा मुद्दा महाराष्ट्रातील प्रत्येक बेरोजगार तरुण-तरुणींच्या मनात खदखदत होताच, आम्ही त्याला वाचा फोडली. मुद्दा मराठी तरुण-तरुणींच्या आयुष्याचा होता आणि लढा होता तेव्हाच्या सरकारशी, जे मुळातच निष्क्रिय होतं. मुळात संघर्ष सुरु झाला तो बाहेरून रेल्वेभरतीसाठी आलेल्या काही तरुणांच्या अरेरावीमुळे. महाराष्ट्रात होणाऱ्या रेल्वेभरतीत, मराठी मुलांचा हक्क असताना, तुम्ही इथे का आलात, हा प्रश्न माझ्या काही महाराष्ट्र सैनिकांनी विचारला. त्यावर त्यांनी शिवीगाळ केली. आमचा मुद्दा रास्त होता, पण समोरची प्रतिक्रिया विचित्र होती म्हणून, त्यामुळे मनसे पद्धतीने आम्ही संघर्ष सुरू केला. या सगळ्यात आमच्यावर प्रचंड टीका झाली, राजकीय व्यवस्थेत आम्हाला एकटं पाडण्याचे पुरेपूर प्रयत्न झाले. राज्यातील एकही पक्ष यावर बोलेल अशी परिस्थिती नव्हती.

आम्ही जो संघर्ष केला, त्याला यश आलं. तत्कालीन रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी निर्देश दिले की यापुढे ज्या राज्यात नोकरभरती असेल तिथे प्राधान्य त्या राज्यातील तरुण-तरुणींनाच मिळायला हवं. आमच्यावर संकुचित प्रादेशिक वादाचा आरोप झाला, पण पुढे मध्य प्रदेशसह अनेक राज्यांनी स्थानिकांना रोजगारात प्राधान्य मिळायलाच हवं असे कायदे केले. म्हणजे आमचा मुद्दा बरोबर होता.

हे आंदोलन २००८-०९ मधलं. या आंदोलनात अनेक महाराष्ट्र सैनिकांनी तुरुंगवास भोगला, पण गेल्या १०-१२ वर्षांत अनेकदा या आंदोलनामुळे नोकरीला लागलेले तरुण-तरुणी भेटतात तेव्हा छान वाटतं. आम्ही या विषयातून एक खूप मोठा संघर्ष उभा केला, ज्याची दखल महाराष्ट्राने घ्यावी इतकीच इच्छा.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने राज्यभर ५०० हून अधिक रोजगार मार्गदर्शन मेळावे भरवले !

रोजगाराच्या संधी सांगणे, त्यासाठी मार्गदर्शन करणे आणि रोजगार मिळाला की त्याचा पाठपुरावा करणे हे काम तर पक्षाच्या कामाचा स्थायीभाव आहे.

या कामात महिलांना रोजगार मिळण्यावर आमचा भर असतो. महिलांना स्वत:च्या पायावर उभं राहता यावं म्हणून मुंबईत दिलेल्या १०० ऑटोरिक्षा, ठाण्यात महिलांना दिलेले रिक्षा-परवाने, बीडमध्ये विधवा माता-भगिनींना रोजगार मिळावा म्हणून दिलेलं शिवणयंत्राचं प्रशिक्षण, 'कोकण नवनिर्माण महिला औद्योगिक संस्थेमार्फत' दिलेलं लघु-उद्योगासाठी प्रोत्साहन या काही वानगीदाखल गोष्टी.

आम्ही पुन्हा सांगतो रोजगार मेळावे, रोजगार मिळावा यासाठी आम्ही जिल्ह्या-जिल्ह्यात इतकी असंख्य आंदोलनं केली आहेत, ते सगळं मांडायला लागलो तर ही पुस्तिका नाही तर तो ग्रंथ होईल.







महाराष्ट्रातील शहरांना अनधिकृत रिक्षा आणि टॅक्सींनी वेढून टाकलं होतं, त्यावर पहिली कारवाई झाली ती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळे !

कल्पना करा, तुमच्या घरातील व्यक्ती, तुमचे मित्र मैत्रीण समजा अशा रिक्षा-टॅक्सीमधून रात्री-अपरात्री प्रवास करणार असतील, ज्या टॅक्सी-रिक्षाचालकाकडे अधिकृत परवानाच नाही, तर तुम्हाला झोप लागेल? उद्या हा अनधिकृत, परवाना नसलेला रिक्षा-टॅक्सीवाला जर गुन्हा करून पळून गेला तर त्याला शोधणार कसं? महाराष्ट्राच्या प्रमुख शहरांमध्ये अशा अनधिकृत रिक्षा, टॅक्सींचा सुळसुळाट झाला होता. त्यातील गुन्हेगारी हा मुद्दा होताच, पण यामुळे अधिकृत परवाने असलेल्या रिक्षा-टॅक्सीचालकांचं जे नुकसान होतं ते वेगळंच. या विरोधात आम्ही आंदोलन सुरू केलं.

आमचं आंदोलन सुरू झालं आणि परिवहन विभाग खडबडून जागा झाला आणि त्यांनी या परवाना नसलेल्या रिक्षा-टॅक्सी तोडायला सुरुवात केली. आमच्या आंदोलनामुळे या अशा रिक्षा-टॅक्सींना काहीसा चाप बसला, पण हा विषय पूर्ण सुटला असेल असं नाही. आमचे महाराष्ट्र सैनिक आजदेखील अशा रिक्षा-टॅक्सी आढळल्या तर परिवहन विभागाला कळवतात. हा प्रश्न आम्ही पूर्णपणे सोडवू शकतो, अर्थात यासाठी तुम्ही आमच्या हातात हे राज्य द्यायला हवं.



# मायक्रोफायनान्स कंपन्या आणि पीक विमा कंपन्यांच्या मुजोरीवर चाप बसला, तो महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळेच !

शेती आणि शेतकरी प्रश्नांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं सातत्यानं भूमिका घेतली आहे. शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे आणि शेतकरी आपला शेतमाल मुक्तपणे हवा तिथे विकू शकला पाहिजे या प्रमुख मागण्यांभोवती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं आंदोलनं, मोर्चे आणि कार्यक्रम-उपक्रमांची माळ लावली. खतं, बी-बियाणं यांचे वाढते भाव, विस्कळीत वीजपुरवठा, अपुरा पतपुरवठा आणि विमा कंपन्यांची अरेरावी याविरुद्ध सतत लढे उभारले आणि शेतकरीवर्गाला न्याय मिळवून दिला.

शेतीचा प्रश्न हा निव्वळ उत्पादनाशी संबंधित नाही तर बाजाराशी, शेतमाल मुक्तपणे विकता न येण्याशी आहे याची पक्षाला जाणीव आहे. याही संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं कृषी परिषदा घेतल्या आणि आंदोलनं केली.

तसंच महाराष्ट्रभर मायक्रो फायनान्स कंपन्यांचं पेव फुटलं आहे. गरजू माणसाला ते कर्ज देतात आणि त्याला शब्दशः नाडतात. या कंपन्यांच्या पिळवणुकीला कंटाळलेले नागरिक वारंवार आमच्याकडे येऊ लागले, तेंव्हा हा विषय हाती घ्यावाच लागला.

मेळावे घेतले, आंदोलनं केली, वेळेला चोप दिला. अर्थात हा विषय लगेच सुटणार नाही आणि यासाठी राज्य सरकारने धोरण बनवायला हवं.



# राज्याच्या विकासाची 'ब्ल्यू-प्रिंट' मांडणारा देशातला पहिला राजकीय पक्ष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

महाराष्ट्र तर सोडाच, पण देशभरात असा एक राजकीय पक्ष दाखवून द्या ज्याने जनतेसमोर, त्या राज्याच्या विकासाचा दीर्घकालीन आराखडा काय असेल हे मांडलं आहे?

दर ५ वर्षांनी तेच तेच जाहीरनामे मांडायचे, जे खरं तर तत्काळ रद्दीत टाकायच्या लायकीचे असतात आणि त्यावर मतदान मागायचं.

हेच आम्हाला अमान्य आहे. एखादा देश असो की उद्योगसमूह यांच्याकडे दीर्घकालीन विकासाचा आराखडा असतो, म्हणून ते यशस्वी होतात. महाराष्ट्राचा विकासाचा आराखडा असावा या विचारातून आम्ही महाराष्ट्राचा विकास आराखडा मांडला. तो http://mnsblueprint.org या संकेतस्थळावर सादर केला. या प्रसंगाला ९ वर्ष होत आली, पण आजदेखील कुठे आहे तुमचा विकास आराखडा?, असा प्रश्न जेव्हा काही पत्रकार विचारतात तेव्हा वाईट वाटतं.

विकास आराखडा ही प्रवाही कल्पना आहे, तो लोकांनी वाचावा, त्यात बदल सुचवावेत ही अपेक्षा. आणि तो आराखडा राबवण्यासाठी आम्हाला संधी द्यावी. जर तुमच्या आमच्याकडून अपेक्षा आहेत तर मग आम्हाला संधी पण द्या. रस्त्यावरच्या संघर्षातून काय साध्य करू शकतो हे आम्ही दाखवलंच आहे, पण सत्ता आली तर काय करू शकतो हे पण आम्ही दाखवून दिलं आहे. तेव्हा दीर्घकालीन विचार करणाऱ्या पक्षाला संधी द्यायला हरकत काय आहे?



रितसर अभ्यासक्रम
देऊन, परीक्षा घेऊन,
उमेदवार संसदीय
राजकारणासाठी योग्य
आहे का नाही हे
बघणारा एकमेव पक्ष
म्हणजे महाराष्ट्र
नवनिर्माण सेना !

आपण लोकांचे प्रतिनिधी म्हणून आमदार, खासदार किंवा नगरसेवक निवडून देतो, परंतु त्याला किंवा तिला त्यांचं काम माहीत आहे की नाही हे पाहत नाही. पक्षानं २०१२ सालच्या महानगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारांना अभ्यास करता यावा म्हणून आधी अभ्यासक्रम तयार केला, त्यावर आधारित पुस्तकं तयार केली आणि नंतर त्यांची लेखी परीक्षा घेऊन उमेदवारी दिली.

कामाला अभ्यासाची, प्रशिक्षणाची जोड देणारा हा एकमेव राजकीय पक्ष आहे. याचा परिणाम नंतर लगेच दिसला. परीक्षा घेऊन ज्यांना उमेदवारी दिली ते जेव्हा नगरसेवक झाले तेव्हा त्यांनी उत्तम कामं केली. नाशिक, पुणे, मुंबई येथील नगरसेवकांनी केलेल्या कामांची लोक अजून आठवण काढतात.

बरं, परीक्षा सुरुवातीलाच का घेतल्या, पुढे का नाही? राजकीय पार्श्वभूमीची पाटी कोरी असलेल्या पण हेतू शुद्ध असलेल्यांचा वकुब जाणून घेण्यासाठी सुरुवातील परीक्षा घेतल्या. आज पक्ष स्थापनेला १७ वर्षं झाल्यावर आमचे हजारो महाराष्ट्र सैनिक संसदीय राजकारणात तरबेज झाले आहेत आणि लोकप्रतिनिधी होण्यासाठी पूर्ण सक्षम आहेत.

मुंबई, पुणे,नाशिक, कल्याण-डोंबिवलीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नगरसेवकांच्या वॉर्डांमध्ये आजदेखील त्यांनी केलेली कामं पहा, म्हणजे तुम्हाला जाणवेल. बरं, आमच्या एकाही नगरसेवकावर एकही भ्रष्टाचाराचा आरोप नाही आणि होऊ शकत नाही. कारण राजकारणातून व्यक्तिगत अर्थकारण चालवणं ही संकल्पनाच आम्हाला अमान्य आहे.

## एक मुद्दा, जो महाराष्ट्राने जरूर लक्षात घ्यावा तो म्हणजे आमचा पदाधिकारी हा 'कोणाचा' 'कोण' नाही. त्याच्याकडे राजकीय पार्श्वभूमी नाही ना राजकारणातून येणारी आर्थिक ताकद. तो सामान्य घरातून आला आहे आणि आम्हाला सामान्य घरातून आलेल्यांनाच राजकारणात आणायचं आहे.

मुंबईच्या २० वर्षांच्या आराखड्यावर चर्चा आणि जनमत घडवून आणणारा महाराष्ट्रातील पहिला आणि एकमेव पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

मुंबईसारख्या महानगराचा विकास आराखडा दर २० वर्षांसाठी बनवला जातो. गेली कित्येक दशकं तो मुंबईकर जनतेला सादर केल्याचा भास निर्माण केला जायचा, पण त्यावर मुक्त चर्चा व्हावी, मुळात असा आराखडा तयार होतोय आणि त्यात आपल्या सूचना, आक्षेप नोंदवण्याचा आपला अधिकार आहे हेच मुंबईकरांना माहीत नव्हतं किंवा माहीत व्हावं असं राजकीय व्यवस्थेला कधीच वाटलं नाही.

या विषयाला तोंड फोडलं ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने. मुंबईचा २०१४-३४ चा वीस वर्षांचा आराखडा जेव्हा सादर झाला तेव्हा त्यावर चर्चा व्हायला पाहिजे, मुंबईकरांच्यात जागृती व्हायला पाहिजे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुढाकार घेतला. त्यासाठी मुंबईतील सामान्य नागरिकांपासून ते मान्यवरांपर्यंत सगळ्यांना एका व्यासपीठावर आम्ही आणलं.

मुंबईतील रंगशारदा सभागृहात विकास आराखड्यातील त्रुटींचे सादरीकरण करण्यात आलं आणि मग तिथे जमलेल्या मान्यवरांना आणि सामान्य जनतेला यावर आपले आक्षेप नोंदवण्याचं आवाहन केलं आणि याला आम्ही कुठेही राजकीय स्वरूप येऊ दिलं नाही. या संपूर्ण कार्यक्रमात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं कोणतंही ब्रॅण्डिंग न ठेवता हा खुला संवाद ठेवला. त्यानंतरदेखील लोकांना आक्षेप नोंदवण्यासाठी जे फॉर्म्स दिले तेदेखील अराजकीय असतील हे पाहिलं.

इतका मोठा उपक्रम आणि तोदेखील राजकीय लाभाचा विचार न करता इतर कुठल्या राजकीय पक्षाने केल्याचं तुम्हाला आठवतंय का?



‘टोल’धाडीविरुद्ध आंदोलन करून ६५ टोलनाके बंद करायला लावणारा पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना !






चांगले रस्ते हवे असतील तर टोल भरायला हवा, याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला कधीच आक्षेप नव्हता, पण टोल भरून देखील चांगले रस्ते मिळत नसतील तर ? तो टोल किती वर्ष वसूल झाला पाहिजे ? जो टोल या कंपन्या गोळा करतात त्याचं नक्की काय होतं ? टोलच्या रोख रकमेबद्दलची पारदर्शकता कधीच का ठेवली गेली नाही ? हे आमचे प्रश्न होते.

हे प्रश्न आम्ही सरकारला विचारायला सुरुवात केली आणि सामान्य जनतेला हा मुद्दा जाणवला. टोल भरून पण रोज पाठ मोडेल अशा खड्ड्यातून लोकं प्रवास करत होते. आपण हे कसले पैसे भरतो हे त्यांना कळतच नव्हतं. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उपस्थित केलेल्या प्रश्नांना प्रतिसाद मिळू लागला.

जेव्हा सरकारच टोल कंपन्यांना सामील आहे तेव्हा शेवटचा पर्याय म्हणून आम्ही आक्रमक आंदोलनं केली, न्यायालयात गेलो, हजारो महाराष्ट्र सैनिकांनी तुरुंगवास सोसला. यातून ६५ टोलनाके सरकारने बंद केले. हे कोणामुळे झालं? महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळेच. पण तरीही आम्ही टोलचं आंदोलन अर्धवट सोडलं असं बोट आमच्याकडे का दाखवलं जातं? रस्त्यावरच्या संघर्षातून जर आम्ही ६५ टोलनाके बंद करू शकत असू तर मग सरकार नावाच्या यंत्रणेला तर हे काम सोपं नाही का? पण मुळात त्यांचे हेतू स्वच्छ नाहीत, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे हेतू स्वच्छ होते म्हणून आम्हाला यश मिळालं.

तुम्हाला जर खरंच 'अवाजवी टोलमुक्त' महाराष्ट्र हवा असेल तर आम्हाला संसदीय राजकारणात बहुमताने निवडून द्या, महाराष्ट्राला अवाजवी टोलच्या जाळ्यातून आम्ही १००% मुक्त करू. इतकंच नाही, तर जिथे टोल वसुली केली जात आहे तिथे रस्ते उत्तम असतील, प्रवाशांना सगळ्या सुविधा मिळतील हे आम्ही जरूर पाहू.





‘मोर्चा’ हे एक असं माध्यम आहे की ज्यातून जनतेच्या मनातील राग, संताप व्यक्त होतो. गेल्या १६-१७ वर्षांत महाराष्ट्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे असे अनेक मोर्चे निघाले...

## नागरिकत्व सुधारणा कायद्याला पाठिंबा देणारा इशारा मोर्चा:

नागरिकत्व सुधारणा विधेयक आणि राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (CAA, NRC) विरोधात केवळ रागापोटी मुसलमान समाजाकडून मोर्चे काढले जात होते. या मोर्चाच्या विरोधात स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवणारा महाराष्ट्रातील पक्ष पण गप्प होता. खरं तर या कायद्यात गैर काहीच नव्हतं. केवळ राम मंदिर झालं आणि ३७० कलम हटवलं गेलं म्हणून मुसलमान निषेध मोर्चे काढत असतील तर त्यांना उत्तर देणं भाग होतं. आम्ही इशारा मोर्चानं त्यांना सणसणीत उत्तर दिलं. देशपातळीवरच्या एका महत्त्वाच्या सुधारणांना जर कोणी धर्माच्या चष्म्यातून पाहून राजकारण करणार असेल आणि मोर्चे काढणार असतील, तर या देशातील हिंदू बांधव-भगिनी आता गप्प बसणार नाही. हे आम्ही या मोर्चातून दाखवून दिलं.

## 'रेल्वे स्थानक परिसर फेरीवालामुक्त करा' म्हणून संताप मोर्चा:

मुंबईत प्रभादेवी येथे रेल्वे पुलावर चेंगराचेंगरी झाली आणि ३० मुंबईकर मृत्युमुखी पडले. ही अक्षरशः लाजीरवाणी आणि मन सुन्न करणारी घटना होती. अनधिकृत फेरीवाल्यांच्या विळख्यात स्टेशन्स अडकली होती. बरं, या अनधिकृत फेरीवाल्यांची मजल प्रवाशांना धक्काबुक्की करण्यापर्यंत गेली होती. त्यात प्रवाशांसाठी सोयीसुविधांचा अभाव, रोजची लोकल ट्रेनमधली चेंगराचेंगरी वेगळीच. आणि अशावेळेस आपले सहप्रवासी जेव्हा चेंगरून मृत्युमुखी पडतात हे पाहून मुंबईकर रेल्वे प्रवासी संतापाने खदखदत होता. या संतापाला, क्लेशाला वाचा फोडण्यासाठी आम्ही 'संताप मोर्चा' काढला. रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला आणि प्रवाशांसमोर इशारा पण दिला. आणि १५ दिवसांत रेल्वे परिसर फेरीवालामुक्त झाला.





# रझा अकादमीविरुद्ध निषेध मोर्चा:

रझा अकादमीच्या एका सभेनंतर धर्मांध मुसलमानांनी धुडगूस घालायला सुरुवात केली. पोलिसांवर, महिला पोलिसांवर हल्ले झाले. माध्यम प्रतिनिधींनाही त्यांनी सोडलं नाही, वार्तांकन करणाऱ्या त्यांच्या ओबी व्हॅन्सचं अपरिमित नुकसान केलं. कोट्यवधी रुपयांचं सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान केलं. अगदी ‘अमर ज्योती जवान’ स्मारकाचीही नासधूस केली. ही कुठली मग्रुरी? महाराष्ट्रासारख्या राज्यात अशी घटना घडणार असेल आणि तरीही सरकार आणि स्वतःला हिंदू हिंदू म्हणत राजकारण करणारे पक्ष गप्प बसणार असतील तर त्यांनी बसावं मूग गिळून. आम्ही धडा शिकवायचं ठरवलं. २१ ऑगस्ट २०१२ ला मुंबईत तमाम हिंदू बांधव-भगिनींचा विशाल मोर्चा काढला. या मोर्चातील आक्रोश आणि राग इतका उग्र होता की तो पाहून निष्क्रिय होऊन बघत बसलेलं तत्कालीन सरकार खडबडून जागं झालं आणि पोलीस आयुक्तांची उचलबांगडी झाली. जेव्हा जेव्हा हिंदू बांधवांवर किंवा हिंदू धर्मावर कोणी आक्रमण करेल तेव्हा तेव्हा आम्ही त्यांच्यावर तुटून पडलो आहोत आणि भविष्यातदेखील तुटून पडू.

## परिवहन (एसटी) कामगार मोर्चा:

ग्रामीण महाराष्ट्राची जीवनरेखा म्हणजे एसटी. परंतु ही एसटी कमकुवत करून त्याचा खाजगी व्यावसायिकांना फायदा करून देण्याचं कुटील कारस्थान महाराष्ट्रात चालू आहे. त्यातलाच एक भाग म्हणजे एसटी कामगारांच्या रास्त मागण्या मान्य न करणं आणि एसटी अस्थिर करणं. याविरुद्धचा दणदणीत मोर्चा हे सगळे प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी उपयोगाचा ठरला.

## शेतकरी मोर्चा:

शेतकरी वर्गाला सरसकट कर्जमुक्ती द्यावी, स्वामीनाथन आयोगातील शिफारसी लागू कराव्यात, पीक विमा मिळावा, संपूर्ण मराठवाडा दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा, कृषी वीज आकारणी माफ करावी, रोजगार हमीची कामं तातडीनं सुरू करावीत ह्या आणि अशा इतर मागण्यांसाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये एक मोठा 'दंडुका' मोर्चा काढण्यात आला. ज्यामुळे शासनाला शेतकऱ्यांच्या रास्त मागण्या डोळ्यांपुढे ठेवून काही विशिष्ट योजना जाहीर कराव्या लागल्या. जे आपल्या या मोर्चाचं यश होतं.



# मशिदींवरच्या भोंग्याविरुद्ध आवाज उठवून, आंदोलन उभा करणारा पक्ष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना !



धर्म खरं तर घरात ठेवावा, पण जर मुसलमान तो रस्त्यावर आणणार असतील आणि मशिदींवर अनधिकृत भोंगे लावून जर सामान्य लोकांना त्रास देणार असतील तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना शांत बसणार नाही. मशिदींवरचे अनधिकृत भोंगे कानठळ्या बसेपर्यंत वाजत असतात, ज्याचा त्रास सगळ्यांना होतो, त्यातल्या त्यात लहान मुलं आणि वृद्ध माणसांना तर जास्तच होतो. इतकी सरकारं आली गेली, पण कोणीच काहीच कारवाई करायला तयार नाही. अगदी हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या राज्यातील पक्षाचं सरकार येऊन गेलं, पण काहीच कारवाई नाही. सगळ्या सरकारांना निर्बंध लादायला फक्त हिंदू धर्मीयच दिसत होते.

लोकं मुकाट सहन करत होते. मशिदीचे लोक मात्र सर्रास कायदा मोडत होते, पण बोलणारं कुणीच नव्हतं. राज ठाकरेंनी यावर गुढीपाडव्याच्या सभेत इशारा दिला की हे भोंगे थांबले नाहीत तर आम्हाला लाऊडस्पीकर लावून हनुमान चालिसा म्हणावी लागेल.

महाराष्ट्रात, महाराष्ट्र सैनिकांनी ठिकठिकाणी हनुमान चालिसा लावली, भोंग्यांचे आवाज थांबले. मुळात असं ध्वनिप्रदूषण कायद्याला पण मान्य नाही. पण हा कायदा मशिदींवरच्या भोंग्यांच्या बाबतीत विसरला जात होता, पण आमचं 'हनुमान चालिसा' आंदोलन सुरू झालं आणि राज्यात तर उमटलेच, पण देशभर उमटले. देशभर या विषयावार हिंदू जनमत एकवटलं आणि उत्तर प्रदेश सरकारने याची दखल घेत भोंगे उतरवले. महाराष्ट्रातदेखील तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला नाइलाजाने ते भोंगे उतरवावे लागले. हिंदू जनशक्तीच्या एकजुटीचं हे एक अप्रतिम उदाहरण म्हणावं लागेल.

एकीकडे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ले होणार आणि तरीही पाकिस्तानी कलाकारांना भारतात काम दिलं जाणार ? महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या पाकिस्तानी कलाकारांना ४८ तासात भारताबाहेर हुसकावले !

आपल्या देशात हजारो निरपराध्यांची हत्या करणारे दहशतवादी आणि त्यांना साथ देणारा पाकिस्तान हे आपले शत्रूच आहेत. अशा शत्रूदेशातून इथे कलाकार येणार आणि कार्यक्रमात नाचणार हे चालणार नाही. हा देशाच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे आणि देशाचा अपमान आहे म्हणून पक्षानं त्या कलाकारांच्या भारतात येण्याला विरोध केला.

या आंदोलनाचे पडसाद देशभर उमटले. पाकिस्तानी कलावंत असलेले कार्यक्रम तर झाले नाहीतच, पण पाकिस्तानी कलावंत असलेले चित्रपटही देशात प्रदर्शित झाले नाहीत.



# ...तर पाकिस्तानी कलाकारांना घुसून मारू – मनसेचा इशारा

**48 तासांचे अल्टिमेटम**

**मुंबई** : उरीतील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मनसे आता भारतातील पाकिस्तानी कलाकारांविरोधात आक्रमक झाली आहे. पाकिस्तानी कलाकारांनी ४८ तासांच्या आत भारत सोडावा, अन्यथा त्यांना मनसे स्टाईलने उत्तर देण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अमेय खोपकर आणि शालिनी ठाकरे यांनी दिला आहे. मनसेच्या या इशाऱ्यामुळे करण जोहरच्या 'ए दिल है मुश्कील' व शाहरूख खानच्या 'रईस' या सिनेमाचे प्रदर्शन धोक्यात आले आहे. या चित्रपटात पाक कलाकार फवाद खानची भूमिका आहे. मुंबई पोलिसांनी मात्र कायदेशीररीत्या अधिकृतपणे आ… परदेशी नागरिकांना संरक्षण देण्यात… असे स्पष्ट केले आहे.

उरीतील दहशतवादी हल्ल्… भारतात पाकिस्तानविरोधात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर मनसेच्या चित्रपट शाखेने पाकिस्तानी कलाकारांविरोधात आंदोलन छेडले आहे.

छाया : दीपक साळवी

देणार नाही. त्यांच्या सुरू असलेल्या शूटिंगच्या ठिकाणी घुसून मारू, असा इशारा मनसेने दिला आहे.

मनसेच्या या भूमिकेमुळे करण जोहरचा 'ए दिल है मुश्कील' तर शाहरूख खानचा 'रईस' हा चित्रपट अडचणीत येण्याची शक्यता आहे. कारण ए दिल है मुश्कीलमधील अभिनेता फवाद खान, तर रईसमधील अभिनेत्री माहिरा खान हे दोघेही पाकिस्तानी आहेत. दरम्यान, मुंबई पोलिसांनी मात्र जे परदेशी नागरिक अधिकृतरीत्या आणि कायदेशीरपणे



# MNS issues ultimatum to Pakistani artistes: Leave India within 48 hrs

**EXPRESS NEWS SERVICE**
MUMBAI, SEPTEMBER 23

THE MAHARASHTRA Navirman Sena on Friday issued an ultimatum to Pakistani artistes working in India, asking them to leave the country within 48 hours or "risk being beaten up".

"When our soldiers are being killed on the borders by Pakistan, why should we host their actors here? We warn all Pakistani actors to leave India in the next 48 hours. If they do not do so, MNS activists will give them a thrashing," said Ameya Khopkar, president of the MNS Chitrapat Karmachari Sena.

The Shiv Sena too has supported the demand to block entry of Pakistani actors in the country after the Uri attack.

"Why are we continuing any kind of relationship with them? The time has come to snap all ties with Pakistan immediately," said Shiv Sena MP Sanjay Raut.

Khopkar also said that the MNS would target not only Pakistani actors, but also the producers and directors who hire them.

"*Pakistani kalakaar toh maar khaayenge hi, saath mein jo producer/director unko laate hain unko bhi peetenge* (Pakistani artistes will be beaten up, and so will the producers and directors who get them here)," he said.

Several Pakistani artistes are part of Indian films either as actors or singers.

The Mumbai Police, meanwhile, has claimed that it will protect all foreign individuals who are working with proper work permits in India.

Leaders from the ruling BJP also joined the chorus of not disallowing actors from Pakistan to perform in the country in the current environment.

Kirit Somaiya, Member of Parliament, BJP, while saying that he did not back the threats issued by the Maharashtra Navnirman Sena, said, "At this point of time, we appeal to business leaders, film producers, and organisers not to invite artistes from Pakistan for events and films."

**MNS Chitrapat Sena holds a press conference at Krishna Kunj in Dadar over the issue.** *Ganesh Shirsekar*

mumbai.newsline
@expressindia.com

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची अचूक जाण असणाऱ्या श्री. राज ठाकरे ह्यांच्यामुळे परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न निकाली लागले.

वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी ‘नीट’(NEET) परीक्षेबाबत अभ्यासक्रमात आणि परीक्षेच्या स्वरूपात अचानक बदल झाला. विद्यार्थी फार अडचणीत आले. त्यांच्यासाठी मा. राज ठाकरेंनी पंतप्रधान मोदींना संपर्क साधून त्यांना दिलासा दिला.

अधिवास नियमाकडे राज्य सरकारनं दुर्लक्ष केल्यानं वैद्यकीय प्रवेशातच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर अन्याय होणार होता. यावर पक्षानं आवाज उठवल्यानं या प्रश्नाकडे लक्ष वेधलं गेलं. न्यायालयानंही नंतर मराठी मुलांच्या बाजूनी निकाल दिला.

पेपरफुटीमुळे सीबीएसईनी दोन विषयांच्या परीक्षा पुन्हा घ्यायचं ठरवलं. प्रशासकीय ढिलाईमुळे काही समाजकंटक फायदा घेतात आणि पेपरफुटी होते. त्यात विद्यार्थ्यांची किंवा पालकांची काय चूक?. राजसाहेबांनी देशभरच्या पालकांना आवाहन केलं की “ही चूक तुमची नाही, तुम्ही तुमच्या मुलांना फेरपरीक्षेला बसवू नका.” त्यानुसार या भूमिकेला देशभरातून पाठिंबा मिळाला. अखेर ही फेरपरीक्षा होणार नाही असा निर्णय झाला.

मूकबधीर विद्यार्थ्यांच्या काही रास्त मागण्या होत्या. त्यांना शिकवणारे शिक्षक उपलब्ध नव्हते, त्यांचा रोजगाराचा प्रश्न होता. या मागण्या रेटण्यासाठी हे विद्यार्थी समाजकल्याण आयुक्तालयासमोर उपोषणाला बसले होते, तर तिथे त्यांच्यावर पोलिसांतर्फे अमानुष लाठीहल्ला करण्यात आला. त्या विद्यार्थ्यांना भेटून त्यांच्या लढ्याला राजसाहेबांनी पाठिंबा तर दिलाच, परंतु लाठीहल्ला करण्याच्या सूचना ज्यांनी दिल्या त्यांना बडतर्फ करण्याची मागणीही केली.

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी अवास्तव देणग्या मागणे, विद्यार्थ्यांची असुरक्षित वाहतूक करणे, शाळेतूनच बेकायदा पुस्तक विक्री करणे यासारख्या असंख्य प्रश्नांवर पक्षानं ठिकठिकाणी आंदोलनं उभारली. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफ करावे म्हणून मागणी करून तो प्रश्न धसास लावला.



हिंदू सणांसाठी
मराठी
मनांसाठी
महाराष्ट्र
नवनिर्माण
सेनाच !

हिंदू सणांसाठी सरकार कायमच दुजाभाव करताना दिसतं. त्यातल्या त्यात ज्या सणांचं मराठी संस्कृतीमध्ये फार मोलाचं स्थान आहे अशा सणांमध्ये काही ना काही खोडा घालण्यात राज्य सरकारला आनंद वाटतो की काय असंच वाटतं.

## दहीहंडी जोरात करा !

दहीहंडीसारख्या मराठी सणांवर, पारंपरिक उत्सवावर सर्वोच्च न्यायालयानं निर्बंध लादले. त्याला राज्य सरकारचं कचखाऊ धोरण कारणीभूत होतं. नेहमी गोविंदा पथकाच्या बळावर स्वत:ची पोळी भाजून घेणारे सर्व पुढारी गप्प बसले. गोविंदा पथकं अस्वस्थ होती. ही मंडळी राज ठाकरेंना येऊन भेटली. राजसाहेबांनी त्यावर पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारच्या भूमिकेवर घणाघाती टीका केली.

“सुरक्षेच्या सर्व उपाययोजना अंगीकारून दहीहंडी उत्साहात साजरी करा, भविष्यात जो काही संघर्ष होईल त्याची जबाबदारी मी घेतो” असं म्हणून गोविंदा पथकांना मा. राज ठाकरेंनी आश्वस्त केलं. राजसाहेबांच्या आदेशानुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सर्वत्र पारंपरिक दहीहंडी उत्सवाचं आयोजन केलं.

## गणेशोत्सवावर जाचक अटी नकोत!

जे दहीहंडीचं तेच गणेशोत्सवाचं. मुंबई महापालिकेनं आणि महाराष्ट्रातही इतरत्र, सरकारनं गणेश मंडळांवर जाचक अटी लावल्या होत्या. याबद्दल दक्षिण मुंबईच्या मंडळांनी राजसाहेबांकडे दाद मागितली. तिथेही मा. राज ठाकरेंनी सर्व गणेश मंडळांच्या पाठीशी आपण आहोत आणि गणेशोत्सव जोरात, धूमधडाक्यात साजरा करावा म्हणून सांगितलं. त्यानंतर गणेशोत्सव फार उत्साहानं साजरा झाला.

## दीपोत्सव

दिवाळी हा असाच मराठी मनाला उभारी देणारा सण. दिवाळीलाही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे दरवर्षी शिवतीर्थावर भव्य रोषणाई केली जाते. पक्ष स्वखर्चाने ही रोषणाई करतो त्यामागे हेतू एकच की रोजच्या विवंचनेतून लोकांना आनंदाचे दोन क्षण अनुभवता यावेत.

हे सण म्हणजे मराठी मनाचा, मराठी एकतेचा, मराठी संस्कृतीचा आणि हिंदू परंपरांचा उत्सवच. त्याची जपणूक ही महाराष्ट्र सेनेची बांधिलकी आहे, ती आम्ही कायमच पाळत असतो.

या सणांखेरीज महाराष्ट्र नवनिर्माण सेना ठिकठिकाणी अनेक सांस्कृतिक महोत्सव घेत असते. त्यात खाद्य महोत्सव असतात, क्रीडा-कला महोत्सव असतात. आरोग्य शिबिरं, रोजगार मार्गदर्शन, रक्तदान शिबिरं या गोष्टी तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कामातील अविभाज्य घटक आहेत.

महाराष्ट्रावर कोणतीही आपत्ती आली, तर सर्वतोपरी मदत घेऊन उभी राहते, ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना !

## आपत्तीतील मदतकार्य

महाराष्ट्रावरच्या प्रत्येक संकटाच्या वेळी महाराष्ट्र सैनिक धावून जातोच, परंतु हा आढावा घेत असताना तीन नैसर्गिक संकटांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

मुंबई आणि परिसरात तसेच कोकणात अतिवृष्टीनं थैमान घातलं होतं तेव्हा औषधं, जीवनोपयोगी साहित्य पुरवण्यात महाराष्ट्र सैनिक आघाडीवर होते.

महाराष्ट्राच्या काही भागात २०१३ ते २०१७ असा सतत दुष्काळ पडत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अनेक ठिकाणी टँकर्सनी पाणी पुरवण्यात आलं, चारा छावण्या उभारल्या आणि पाण्यासाठी तळी बांधण्यात आली. मराठवाड्यातील काही भागात विहिरीतील गाळ उपसण्याच्या कामातही महाराष्ट्र सैनिक अग्रेसर होते. त्यातून विहिरी पुन्हा जिवंत करण्यात आल्या.

कोरोनाच्या साथीत महाराष्ट्र सैनिकांनी अफाट काम केलं. लोकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होईल हे पाहिलं, अन्न पुरवलं, ऑक्सिजनची चणचण होती तिथे महाराष्ट्र सैनिक जीवाच्या आकांतानं धावून गेले. जे लागेल ते ते केलं. कोरोनासारख्या साथीत महाराष्ट्र सैनिक लोकांसोबत राहिला आणि काम करत राहिला ही फार अभिमानाची गोष्ट आहे.







तर हा आमचा छोटासा आढावा अहवाल...
छोट्या छोट्या कामांतून, कृतीतून महाराष्ट्र सैनिकांनी महाराष्ट्रातील जनतेच्या आयुष्यात आनंद फुलवला, त्यांच्या संकटात धावून गेले याची मोजदादच नाही आणि ती आम्हाला करायचीदेखील नाही. कारण ते आमचं कर्तव्यच आहे, पण 'आम्ही काय केलं ?' या प्रश्नावर आमचं हे उत्तर...

तुम्हाला ते पटेल आणि आम्हाला अधिक व्यापक काम करण्यासाठी संसदीय राजकारणात येण्याची संधी तुम्ही द्याल याची आम्हाला खात्री आहे.

निशाणी - रेल्वे इंजिन

माहिती तंत्रज्ञानाच्या ह्या काळात, प्रत्येक महत्वाची घटना चलचित्रं (ऑडिओ-व्हिज्युअल ) स्वरूपात साठवून ठेवणं शक्य आहे आणि दीर्घकालीन विचार करून ते डिजिटल स्वरूपात जतन व्हायलाच हवं.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या समाजमाध्यम टीमने, पक्षाच्या प्रवासातील महत्वाच्या टप्प्यांचा ऑडिओ-व्हिज्युअल ठेवा, एमएनएस अधिकृत ह्या युट्युब चॅनेलवर साठवून ठेवला आहे. तसंच पक्षाचं अधिकृत संकेतस्थळ आणि महाराष्ट्राच्या ब्ल्यूप्रिंटची संकेतस्थळ देखील तुम्ही पाहू शकता.

हा सर्व ठेवा पाहण्यासाठी, जर छापील स्वरूपात ही पुस्तिका वाचत असाल तर क्यूआर कोड स्कॅन करा. पण डिजिटल स्वरूपात वाचत असाल तर क्यूआर कोडवर क्लिक करा.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं
अधिकृत संकेतस्थळ

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं
अधिकृत फेसबुक पेज

१९ मार्च २००६ रोजी, पक्ष स्थापनेच्या वेळेस मा.श्री. राज ठाकरे ह्यांनी
महाराष्ट्राच्या दीर्घकालीन विकासाचा आराखडा सादर करेन, असं जाहीर केलं होतं.
तो विकास आराखडा (ब्लूप्रिंट) त्यांनी २५ सप्टेंबर २०१४ रोजी सादर केला होता.
त्या विकास आराखड्याचं संकेतस्थळ

विकासाला सौंदर्यदृष्टीची जोड असेल तरच तो विकास
चिरकाल टिकतो, ही मा. राज ठाकरे ह्यांची धारणा आहे.
तोच विचार मांडणारा, त्यांच्या आवाजातील हा माहितीपट
त्यांनी २५ सप्टेंबर २०१४ रोजी सादर केला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नाशिकच्या सत्तेच्या काळात
आम्ही 'विकासाचं नाशिक मॉडेल' उभं केलं.
आमच्या सत्ताकाळात 'नाशिकचं नवनिर्माण' करणारे
कोणते प्रकल्प उभे केले त्याच्या चित्रफिती.

महाराष्ट्राचा विकास आराखड्याचं
सादरीकरण

मा. राज ठाकरे ह्यांनी घेतलेल्या
विविध पत्रकार परिषदा

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे
विविध वर्धापन दिन सोहळे

विविध महापालिका निवडणूकांच्या
दरम्यान केलेली महत्वाची भाषणं
आणि सादरीकरणं

मा. राज ठाकरे ह्यांच्या
विविध मुलाखती व परिसंवाद

मा. राज ठाकरे ह्यांच्या
विविध जाहीर सभा

निशाणी - रेल्वे इंजिन

प्रकाशक:

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना**

पत्ता:

राजगड मध्यवर्ती कार्यालय, मातोश्री टॉवर्स, पद्माबाई ठक्कर मार्ग,
माटुंगा पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, ४०००१६